**ठळक बातम्या**

- भारत आणि न्यूझीलंड दरम्यानचा द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा निर्धार संयुक्त निवेदनात व्यक्त

- विशाखापट्टनम इथं आयएनएस महेंद्रगिरी या स्वदेशी बनावटीच्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकेचं जलावतरण संपन्न

- भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स राष्ट्रांच्या परिवहन मंत्र्यांच्या परिषदेला नागपूर इथं सुरुवात

**आणि**

- मोनॅको इथल्या 'डायमंड लीग' ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताचा राष्ट्रीय विक्रमवीर सर्वेश कुशारे याने पटकावलं तिसरं स्थान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचा तसंच २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्धार केला आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या न्यूझीलंड दौऱ्याविषयी माहिती देण्यासाठी आयोजित वार्ताहर परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज संरक्षण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय, पर्यटन, क्रीडा आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. यातून दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे.

दोन्ही नेत्यांमध्ये आज ऑकलंड इथं शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा झाल्यानंतर - या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही देशांमध्ये येत्या चार वर्षांत होणाऱ्या संयुक्त उपक्रमांमध्ये ‘भारत-न्यूझीलंड धोरणात्मक भागीदारी- २०३० पथदर्शी आराखडा’ मार्गदर्शक चौकट म्हणून कार्य करेल, यावर या चर्चेत भर दिल्याचं ते म्हणाले. यामुळे दोन्ही देशांमध्ये सहकार्याच्या नवीन संधींचा उदय होईल, अशी अपेक्षा आहे. यानंतर प्रधानमंत्री आज न्यूझीलंड मधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. तब्बल ४० वर्षानंतर भारतीय प्रधानमंत्री

न्यूझीलंडला आले असल्यानं तिथला भारतीय समुदाय त्यांना भेटण्यासाठी अतिशय उत्सुक आहे.

**<><><><><>**

भारत आपली पारंपरिक संरक्षण क्षमता आणि प्रगत तंत्रज्ञान अधिक सक्षम करुन एक मजबूत, आत्मनिर्भर आणि भविष्यासाठी सज्ज संरक्षण दलाची उभारणी करत आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टनम इथं आज आय एन एस महेंद्रगिरी या स्वदेशी बनावटीच्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकेचा जलावतरण समारंभ आणि नौदलात समावेश राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या युद्धनौकेविषयी राजनाथ सिंह म्हणाले…

- **- - होल्ड… बाईट - राजनाथ सिंह** - - -

भविष्यातल्या युद्धांमध्ये कदाचित कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल मात्र युद्ध हे राष्ट्राचा दृढनिर्धार, शूर सैनिक आणि सक्षम लष्करी सामर्थ्याच्या जोरावरच जिंकता येतं असं ते म्हणाले. केवळ दीड वर्षांच्या कालावधीत आपल्या नौदलाच्या ताफ्यात सहा युद्धनौकांचा समावेश झाला असून यातून भारताची जहाजबांधणी क्षमता, संरक्षण उद्योगक्षेत्राचा झपाट्यानं होणारा विस्तार आणि स्वदेशी उत्पादनातली विश्वासार्हता दिसून येते, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नीती आयोगानं आज नवी दिल्लीत 'शांती कायदा २०२५' च्या अंमलबजावणीबाबत सर्व संबंधितांसाठी एक चर्चासत्र आयोजित केलं आहे. या चर्चासत्रात कायदेशीर आणि नियामक आराखडा विकसित करणं, वित्त, विमा आणि जनमानसातली प्रतिमा बळकट करणं, तसंच उत्पादन क्षमता, कार्यान्वयन सज्जता आणि क्षमता बांधणी या बाबींवर प्रामुख्यानं विचारविनिमय होणार आहे. 'भारताच्या परिवर्तनासाठी अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती' अर्थात शांती विधेयक हे अणुऊर्जा क्षेत्राचं नियमन करणाऱ्या कायद्यांचं आधुनिकीकरण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचं प्रतिबिंब आहे. या चर्चासत्रामुळे या क्षेत्रातले तज्ज्ञ, धोरणकर्ते, संशोधन संस्था आणि उद्योजकांना या ऐतिहासिक कायद्याच्या कार्यान्वयन चौकटीवर विचारमंथन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल.

**<><><><><>**

भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स २०२६ परिषदेला आज नागपूरच्या हॉटेल रेडिसन ब्लू इथं सुरूवात झाली. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांच्या तिसऱ्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं. पर्यायी जैव-इंधने आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाचा अवलंब करून रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलवाहतूक क्षेत्रात कार्बन उत्सर्जन शून्य करणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर प्रतिनिधींनी चर्चा केली, अशी माहिती गडकरी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली.

लवचिक आणि शाश्वत परिवहन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी ब्रिक्स सदस्य देशांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण केली जात आहे; तसेच, या सहकार्याला बळकटी देण्यासाठी या बैठकीत 'ब्रिक्स मंत्रीस्तरीय घोषणापत्र २०२६' देखील स्वीकारण्यात आलं आहे, असंही गडकरी यांनी सांगितलं.

इराण, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, चीन, संयुक्त अरब अमिरात, इजिप्त, इंडोनेशिया आणि इथियोपिया या देशातील परिवहनमंत्र्यांनी यात सहभाग घेतला.

<><><><><>

तरुण पिढीने आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचनालयाचा जास्तीत जास्त वापर करावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं जयप्रकाश नारायण सार्वजनिक वाचनालयाचं उदघाटन करताना ते आज बोलत होते. लोकनायक जयप्रकाश नारायण हे महान स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत आणि राष्ट्रीय नेते होते असं शाह यावेळी म्हणाले. गुजरातच्या गांधीनगर लोकसभा मतदारसंघात सरकारने प्रत्येक गावात ३ ते ४ हजार पुस्तकांचं वाचनालय सुरु केलं असून प्रत्येक शाळेशी एका वाचनालयाला जोडलं आहे, अशी माहिती शाह यांनी दिली. दिल्ली सरकारनेही हे वाचनालय शाळांशी जोडून द्यावं असं आवाहन शाह यांनी केलं. यावेळी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता उपस्थित होत्या.

<><><><><>

भारताचा उंच उडीपटू आणि राष्ट्रीय विक्रमवीर सर्वेश कुशारे यानं मोनॅको इथल्या 'डायमंड लीग' ॲथलेटिक्स स्पर्धेत तिसरं स्थान पटकावलं आहे. या स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकांमध्ये स्थान मिळवणारा तो चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे.

अनेक दिग्गज खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत, २ मीटर २८ सेंटीमीटरची उंची पार करण्याचे तिन्ही प्रयत्न अयशस्वी ठरल्यामुळे त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात लॉर्ड्स इथं सुरू असलेल्या पहिल्या महिला क्रिकेट कसोटी सामन्यात काल पहिल्या दिवशी भारतानं पहिल्या डावात २८५ धावा केल्या. स्मृती मंधानानं ८३ धावांची शानदार खेळी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि दीप्ती शर्मा यांनी अर्धशतक झळकवले. पहिल्या दिवसाचा खेळ संपताना इंग्लंडनं एक गडी गमावत २१ धावा केल्या आहेत.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय टी - २० क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंडदरम्यान पाचवा आणि अखेरचा सामना भारतीय वेळेनुसार आज सायंकाळी ७ वाजता सुरू होईल. या मालिकेत इंग्लंडनं ३ - ० अशी आघाडी घेतली आहे.

<><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत आज नॉर्वेचा सामना इंग्लंडशी होणार असून गतविजेत्या अर्जेंटिनाची लढत स्वित्झर्लंडसोबत होणार आहे. या सामन्यांमधून उपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या उर्वरित दोन संघांची नावं स्पष्ट होतील. स्पेन आणि फ्रान्सनं याआधीच उपांत्य फेरीच्या अंतिम चार संघांमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. स्पेननं बेल्जियमवर २-१ असा रोमांचक विजय मिळवून पुढची फेरी गाठली, तर फ्रान्सनं मोरोक्कोवर २-० असा सहज विजय मिळवत आगेकूच केली.

<><><><>

भारतीय हवामान विभागाने पुढच्या तीन दिवसांत बिहार, उत्तर प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. तसंच, पुढील पाच दिवसांत दिल्ली, हरियाणा, चंदीगड, पंजाब, अरुणाचल प्रदेश, गांगेय पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, लडाख आणि जम्मू-काश्मीरमध्ये रेड अलर्टचा इशारा विभागाने वर्तवली आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड आणि ईशान्येकडील

काही भागांत पुढील तीन ते चार दिवसांत विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळी पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**